# पोलिसाच्या पत्नीचे अवयवदान

मनीषा म्हात्रे ● मुंबई



सर्वांना व्हॅलेंटाइन्स डेचे वेध लागलेले असताना माझे प्रेम मला सोडून गेले, मात्र पत्नीचे अवयव दान करून मी तिच्या स्मृती जिवंत ठेवल्या आहेत.

- नंदकिशोर नाईक, पोलीस अंमलदार

आपला २८ वर्षांचा संसार आणि त्याआधीची प्रेमकहाणी पोलीस हवालदार नंदकिशोर नाईक यांनी मृत पत्नीच्या अवयवदानातून चिरंजीव केली आहे. ब्रेनडेड पत्नीचे डोळे आणि यकृत दान करून त्यांनी समाजापुढे आदर्श घालून दिला आहे.

मुंबईतील खार पूर्वेकडील लोकम चाळीमध्ये राहणारे नंदकिशोर नाईक यांचा त्याच चाळीतील शीलासोबत १९८८ मध्ये प्रेमविवाह झाला. दोन मुली आणि एक मुलगा असे त्यांचे छोटेसे कुटुंब. नाईक हे सध्या नागपाडा पोलीस ठाण्यात पोलीस अंमलदार म्हणून कार्यरत आहे.

२८ वर्षे शीलाच्या साथीनेच त्यांच्या संसाराचा गाडा सुरु होता. वेळी-अवेळी लागणाऱ्या ड्यूटी, बंदोबस्त, सुट्या रद्द होणे या सगळ्यात तारेवरची कसरत करणाऱ्या शीला यांना दोन वर्षांपासून उच्च रक्तदाबाचा त्रास सुरु झाला.

९ फेब्रुवारीला शीला चक्कर येऊन कोसळल्या, त्या कायमच्याच. यांना तत्काळ जवळच्या खासगी रुग्णालयात आणि नंतर केईएम रुग्णालयात दाखल केले. मात्र तेथे जागा उपलब्ध न झाल्याने त्यांना नानावटी रुग्णालयात हलवण्यात आले. आयुष्यभराची जमापुंजी नाईक यांनी उपचारासाठी खर्च केली.

◆ व्हॅलेंटाइन्स डे साजरा करण्याची प्रत्येकाची खास पद्धत असते. मात्र या पार्श्वभूमीवर आपले प्रेम गमावलेल्या नंदकिशोर नाईक यांनी पत्नीच्या मृत्यूने खचून न जाता तिच्या अवयवांचे दान करून एक नवा आदर्श घालून दिला आहे. शीला यांच्या अवयवदानाने काहींना दृष्टी तर काहींना नवा जन्म मिळणार आहे.

तथापि, डॉक्टरांनी ब्रेनडेड घोषित केल्याने नाईक यांच्या पायाखालची जमीनच सरकली.

डॉक्टरांच्या सल्ल्यानंतर त्यांनी शीला यांच्या अवयवदानाचा निर्णय घेतला. 'व्हॅलेंटाइन्स डे'च्या पार्श्वभूमीवर त्यांनी आपले प्रेम अवयवदानातून चिरंतन जपले.